# समर्थ सहकारी साखर कारखाना लि.अंकुशनगर ता.अंबड जि.जालना

## ऊस पिकासाठी ठिबक सिंचन संच योजना २०१५ -२०१६

समर्थ सहकारी साखर कारखाना लि.अंकुशनगर युनिट नं.१ व युनिट नं २ (सागर) चे कार्यक्षेत्रातील सर्व सभासद व बिगर सभासद ऊस उत्पादक व शेतकरी बंधुना कळविण्यात येते की, गळीत हंगाम २०१५-१६ करिता आपले काराखान्याचे कार्यक्षेत्रात गळीतासाठी लागवड व खोडवा पुरेसा ऊस उपलब्ध व्हावा म्हणुन ऊस लागण हंगाम २०१४-१५ मध्ये ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता आहे अशा शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व पुर्ण क्षमतेने वापर होणेसाठी ऊस पिका करिता ठिबक सिंचन संच योजना राबविनेचे धोरण मा.संचालक मंडळाने ठरविले आहे. सदर योजनेसाठी जैन इरिगेशन सिस्टीम लि, जळगांव व नेटाफिम इरिगेशन इंडिया प्रा.लि, या दोन ठिबक कंपनीची निवड करण्यात आलेली आहे.

*** ठिबक सिंचन संच वापराचे फायदे :-**

१) उत्पादनात २५% ते ३०% वाढ. २) पाण्याची ४५% ते ५०% पर्यंत बचत. ३) खताची ३०% पर्यंत बचत.४) साखर उताऱ्यामध्ये ०.५% ते १% वाढ. ५) खुरपणीचे खर्चात बचत. ६) राण बांधणीची आवश्यकता नाही. ७) जमिन सपाटीकरणाची आवश्यकता नाही. ८) पिकाच्या गरजेनुसार पाणी दिलेमुळे जमिन खारवट किंवा चोपण होण्याची भिती नाही.

*** ठिबक सिंचन संच योजनेत भाग घेणेसाठी आवश्यक नियम व अटी ***

१) ऊसासाठी ठिबक सिंचन योजना कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासद / बिगरसभासद ऊस उत्पादकांसाठी लागु राहिल. २) सदरची योजना रूंद सरी पद्धत ४ फुट, ५ फुट व ६ फुट असेल, सदरहु योजना आडसाली पुर्वहंगामी व खोडवा पिकासाठी लागु राहिल. ३) एका सभासदास किमान ०.४० आर व जास्तीत जास्त ऊस क्षेत्रासाठी ठिबक सिंचन योजना दिली जाईल. ४) सदरील योजना को-८६०३२, कोसी-६७१, कोव्हीएसआय-९८०५, कोव्हीएसआय-०३१०२, व्हीएसआय-४३४, कोएम-२६५ या जातीची नविन लागवड व खोडवा पिकासाठी असेल.

५) अंदाजे खर्चाचा तपशिल. (प्रति हेक्टर)

| दोन लॅटरल मधील अंतर | हेक्टरी एकुण खर्च रू. | शेतकरी रोख भरणा रक्कम रू. १५% | कारखान अनुदान रू.१०% | जैन/नेटाफिम ठिबक सवलत १४ महिन्यापर्यंत रू.३५% | समर्थ बँक कर्ज रू. ४०% |
|---|---|---|---|---|---|
| ४ फुट | १३५०८३ | २०२६३ | १३५०८ | ४७२७९ | ५४०३३ |
| ५ फुट | ११७३४६ | १७६०२ | ११७३५ | ४१०७१ | ४६९३८ |
| ६ फुट | १०३६०८ | १५५४१ | १०३६१ | ३६२६३ | ४१४४३ |

६) कारखान्यामध्ये नांव नोंदणी केलेल्या लाभधारकाने सदर आधारभुत किंमतीच्या १५ टक्के रक्कम कारखान्याकडे जमा करणे आवश्यक आहे.

७) सदर योजनेसाठी समर्थ सहकारी साखर कारखाना हेक्टरी १०% अनुदान देणार आहे. त्यासाठी ठिबक संच मागणी अर्ज कारखान्याचे नमुन्यात लाभार्थीने कारखान्याकडे ७/१२, ८ अ उतारा (चालु सालाचा) लाभार्थी व दोन ऊस उत्पादक व जामीनदार फोटो, रू १००/- चा स्टँप पेपर संच बसवुन पुर्ण झाल्याचा पाहाणी अहवाल इत्यादी कागदपत्राची पुर्तता करावी लागेल.

८) उर्वरित अंदाजित ४०% रक्कमेसाठी समर्थ सहकारी बँक ४% व्याजदराने कर्ज उपलब्ध करूण देणार असुन त्याची परत फेड प्रत्यक्ष लाभधारकाने पहिल्या ऊस बिलातुन करणे आवश्यक आहे. त्यासाठी लाभधारकाने कर्ज मागणी अर्ज, कर्जदार व जामीनदार यांचे प्रत्येकी दोन पासपोर्ट फोटो, ७/१२, ८ अ उतारा, ऊस नोंद दाखले, बेबाकी प्रमाणपत्र, कारखाना हमी पत्र, ठिबक कंपनीचे इस्टिमेंट व नकाशा १०० रूपयाचे स्टँप पेपर कर्जदार व जामीनदार ओळखपत्र इत्यादी कागदपत्राची पुर्तता बँकसाठी करावयाची आहे.

९) केंद्र व राज्य शासनाकडून मिळनारे अनुदान प्राप्तीसाठी लाभधारकाने पुरवठादार कंपनीस ७/१२, ८ अ, चर्तु : सिमा, नकाशा, माती व पाणी परिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

१०) ३५ % रक्कम शासकीय अनुदान किंवा ऊस बिलातुन पुरवठादार कंपनीकडे वर्ग करण्यात येईल.

११) उर्वरित ३५ % रक्कमेच्या हमी पोटी कारखाना लाभार्थीकडुन दोन कोरे CTS चेक घेईल.

समर्थ सहकारी साखर कारखान्याचे आपले संबंधित शेती विभागीय कार्यालयात ठिबक सिंचन योजनेसाठी संपर्क करून आपली नोंद देऊन कागदपत्राची पुर्तता करावी व ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेऊन मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन वाढवावे हि विनंती.

| व्ही.पी शिंदे | बी.टी.पावसे | ॲड.अमरसिंह खरात | मा.अंकुशरावजी टोपे |
|---|---|---|---|
| मुख्य ऊस विकास अधिकारी | कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | संस्थापक-चेअरमन |

व मा.संचालक मंडळ